N-3)

मसुदा मान्यतेस्तव सादर

उप रचनाकार

सह. वास्तुशास्त्रज्ञ

व.न.र

मा. मु. नि.

मा. मु. का. अ.

# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

## अधिसूचना

क्र.मऔविम/आय.आय.ए./पी-२५६५०२/२०२५

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१

ज्याअर्थी, शासनाचे उद्योग, उर्जा व कामगार विभागाची अधिसूचना क्र. आय.आय.आय. पॉलिसी-२०१०/प्र.क्र.७६८/उद्योग-२ दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३ अन्वये महाराष्ट्राचे धोरण-२०१३ जाहीर करणेत आले. (यापुढे उक्त धोरण असे नमूद केले आहे.)

आणि ज्याअर्थी, जे क्षेत्र शासनाचे भूसंपादन कायदा, १८९४ अथवा महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ अन्वये भूसंपादित झालेले नाही, त्याचे क्षेत्रफळ हे किमान ४० हेक्टर असेल, ( उच्चाधिकार समितीच्या मंजुरीने २० हे.आर ) अशा खाजगी क्षेत्रावर एकात्मिक औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याची योजना राबविण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतलेला आहे, की जी योजना उक्त औद्योगिक धोरणातील अनुसूची अ मधील परिच्छेद-४ (अ) व ४(ब) मध्ये नमुद आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे कलम ४३-(१ब) नुसार महामंडळास कोणत्याही औद्योगिक क्षेत्राला राजपत्रातील अधिसुचनेव्दारे "एकात्मिक औद्योगिक क्षेत्र" म्हणून अधिसूचित करता येईल आणि अशी अधिसूचना काढल्यावर, महामंडळ हे, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये अशा एकात्मिक औद्योगिक क्षेत्राकरीता 'विशेष नियोजन प्राधिकरण' होईल.

आणि ज्याअर्थी, दि. २८/०५/२०१९रोजी संपन्न झालेल्या १०६ व्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत मे. इंद्रण लॉजिस्टीक पार्क प्रा.लि. व मे. इक्षिता लॉजिस्टीक पार्क प्रा.लि यांचे प्रस्तावित मौजे. आजीवली, ता. खालापूर, जि. रायगड येथील क्षेत्राला एकात्मिक लॉजिस्टीक पार्कसाठी सहमती दर्शविली होती.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाने त्यांची अधिसूचना क्र. आय.डी.सी.२०२०/प्र.क्र.४०५/उद्योग-१४, दिनांक २२ डिसेंबर,२०२० अन्वये मौजे. आजीवली, ता. खालापूर, जि. रायगड येथील २३.७६ हे.आर. क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे कलम २ खंड (ग) अन्वये "औद्योगिक क्षेत्र" म्हणून जाहिर केले आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सूचना क्र. मऔविम/आय.एल.पी./सी८२४४९/२०२१, दि. ०९ फेब्रुवारी, २०२१ अन्वये मौजे आजीवली, ता.

खालापूर, जि. रायगड येथील २३.७६हे.आर. इतक्या क्षेत्रासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ४३-१ ब अंतर्गत "एकात्मिक औद्योगिक क्षेत्र (लॉजिस्टीक पार्क)" म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्रातील अधिसुचनेव्दारे दि. ०९ फेब्रुवारी,२०२१ अन्वये जाहिर करण्यात आली.

आणि ज्याअर्थी मे. इंद्रण लॉजिस्टीक पार्क प्रा.लि. व मे. इक्षिता लॉजिस्टीक पार्क प्रा.लि यांनी अर्जान्वये मौजे. आजीवली, ता. खालापूर, जि. रायगड येथील २३.७६ हे.आर. क्षेत्राला "एकात्मिक लॉजिस्टीक पार्क" ऐवजी "एकात्मिक औद्योगिक क्षेत्र" म्हणून घोषित करण्याची महामंडळास विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी, दि. १४/०८/२०२५ रोजी संपन्न झालेल्या १७९ व्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत मे. इंद्रण लॉजिस्टीक पार्क प्रा.लि. व मे. इक्षिता लॉजिस्टीक पार्क प्रा.लि यांचे प्रस्तावित मौजे. आजीवली, ता. खालापूर, जि. रायगड येथील क्षेत्राला एकात्मिक लॉजिस्टीक पार्कचे रुपांतरण करून एकात्मिक औद्योगिक क्षेत्र म्हणून सहमती दर्शविली आहे.

आणि ज्याअर्थी, अर्जदाराच्या विनंतीस अनुसरून दि. १४/०८/२०२५ रोजीच्या १७९ व्या उच्चाधिकार समितीने एकात्मिक लॉजिस्टीक पार्कचे रुंपातरण करून "एकात्मिक औद्योगिक क्षेत्र" म्हणून घोषित करण्यात यावी असे निर्देश देण्यात आलेले असल्यामुळे सदर "एकात्मिक औद्योगिक क्षेत्र (लॉजिस्टीक पार्क)" ची दि. ०९/०२/२०२१ रोजीची अधिसूचना रद्द करून "एकात्मिक औद्योगिक क्षेत्र" घोषित करण्यास मान्यता प्राप्त झाली आहे.

त्या अर्थी, शासनाचे महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (सन-२०१३ चा सुधारणा अधिनियम, १५) च्या कलम ४३ खंड-(१ब) अन्वये महामंडळास प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन, निन्मस्वाक्षरीकार म्हणजे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ याव्दारे उपरोक्त अधिसूचना झालेल्या मौजे. आजीवली, ता. खालापूर, जि. रायगड येथील खालील अनुसुचित उल्लेखिलेल्या औद्योगिक खाजगी क्षेत्रास "एकात्मिक औद्योगिक क्षेत्र" म्हणून घोषित करीत आहे.

उक्त अधिसूचनेची प्रत व सोबत स्थळ निश्चिती चतु;सिमा दर्शविलेला नकाशा हा या अधिसूचनेचा भाग समजण्यात यावा.

## अनुसूची

मौजे आजीवली, ता. खालापूर, जि. रायगड

| अक्र.. | सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|
| १. | ५६/४ | ०.०९० |
| २. | ५६/१ | ०.९७६ |
| ३. | ५६/२ | १.०११ |
| ४. | ५७ | ०.१३४ |
| ५. | ५२ | ०.१८७ |

N-33

| | | |
|---|---|---|
| ६. | ५५/१/ब | ०.८०० |
| ७. | ५४/३ | १.२२० |
| ८. | ५५/३ | ०.०१० |
| ९. | ५३/४ | २.२६१ |
| १०. | ६६/१ | ०.०८० |
| ११. | ५८/१/ब | १.५७१ |
| १२. | ५८/१/अ | १.६२२ |
| १३. | ५८/१/क | ०.३७४ |
| १४. | ५०/१/ब | ०.४७० |
| १५. | ५०/२ | ०.३१८७ |
| १६. | ५१/१ | ०.१६३८ |
| १७. | ५१/२ | ०.१०६२ |
| १८. | ५०/१/अ | ०.१५२३ |
| १९. | ५४/१ | ०.१८२ |
| २०. | ५४/२ | ०.६५२ |
| २१. | ५६/३/अ | ०.३२६ |
| २२. | ६३/२ | ०.१११ |
| २३. | ६१ | ०.०७० |
| २४. | ६२/१/ब | ०.१०० |
| २५. | ६३/१/अ/१ | ०.२५७ |
| २६. | ६३/१/ब | ०.१०० |
| २७. | ६२/१/अ | १.०६० |
| २८. | ६३/१/अ/२ | १.३३१ |
| २९. | ६२/२ | ०.७०० |
| ३०. | ६४/४ | ०.२०५ |
| ३१. | ६४/१ | ०.६६७ |
| ३२. | ६५/१/अ/३अ | ०.२५४ |
| ३३. | ६५/१/अ/१ब | ०.७०० |
| ३४. | ३ | ०.४३५ |
| ३५. | ८ | ०.१६२ |
| ३६. | ७/२ | ०.८१२ |
| ३७. | २/१/अ/४ | ०.३८० |
| ३८. | २/२ | ०.०२० |
| ३९. | २/१/ब | १.२०० |
| ४०. | ९/१/क | ०.१७० |
| ४१. | ९/२/अ | १.०३० |
| ४२. | ९/१/अ | ०.८८९ |

| | | |
|---|---|---|
| ४३. | ९/२/ब | ०.४०० |
| एकुण | | २३.७६ |

चतु : सीमा

उत्तरेस : सर्व्हे नंबर ४०, खोपोली पेण रोड, ४८, ४९, मस्जिद, १अ, ४,५,६.

दक्षिणेस : नदी

पूर्वेस : सर्व्हे नंबर १अ, ६०, गावठाण, ५, ४, मौजे वनवटी गावाची हद्द.

पश्चिमेस : सर्व्हे नं. ४०, माईन, ३७,३६,१२,११,६८,१० आणि २०.

ठिकाण : मुंबई-९३.

दिनांक : १६/१२/२०२५

पी. वेलरासु , भा.प्र.से.

मुख्य कार्यकारी अधिकारी,

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ